दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक २२६ | MAHMAR/2006/17212 | रायगड | गुरुवार, दि.१३ नोव्हेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## पनवेल शहरात १६ लाखाची घरफोडी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घरात कोणी नसताना दरवाज्याचा कडी–कोईडा तोडून आत कपाटामध्ये ठेवलेले दागिने व रोख रक्कम असा एकूण सुमारे १६ लाख रुपये किमतीची ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना पनवेल शहरात भरदिवसा घडली आहे.

पनवेल शहरातील महात्मा फुले रोड येथील श्री स्वामी समर्थ सोसायटी येथे राहणारे चैतन्य काळे यांचे घराचे दरवाजे बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने दरवाज्याचा कडी–कोईडा तोडून आत कपाटामध्ये ठेवलेले १५ लाख ३५ हजार रुपये किमतीचे दागिने व ६० हजार रोख रक्कम अज्ञात चोरट्याने चोरून नेले. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पागोटे गावाजवळ पेट्रोल पाईप लाईन फुटल्याने उरण–खारकोपर रेल्वे सेवा ठप्प

### प्रशासनाच्या प्रसंग सावधगिरी मुळे मोठा अनर्थ टळला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

धुतूम ग्रामपंचायत हद्दीतील इंडियन ऑईल अदानी व्हेंचर्स लिमिटेड या कंपनीत जेएनपीए बंदरातून जाण–ारी पेट्रोल– नाफ्ता या अति ज्वलनशील पाईप लाईन बुधवारी ( दि११) सकाळी फुटल्याची घटना घडली. नागरिक व प्रशासनाच्या प्रसंग सावधगिरी मुळे मोठा अनर्थ टळला आहे. मात्र सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उरण – खारकोपर रेल्वे सेवा बंद केल्याने त्यांचा त्रास हा प्रवाशी नागरीकांना सहन करावा लागला आहे.



उद्योगपती गौतम अदानी यांच्या ताब्यात असलेल्या इंडियन ऑईल अदानी व्हेंचर्स लिमिटेड या कंपनीत प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे वारंवार स्फोटाच्या घटना किंवा जेएनपीए बंदरातून धुतूम ग्रामपंचायत हद्दीतील प्रकल्पात येणाऱ्या पेट्रोल, डिझेल, नाफ्ता या ज्वलनशील पदार्थ वाहून आणणाऱ्या पाईप लाईनला चोरीच्या उद्देशाने ट्याप लावण्याच्या घटना घडत आहेत.

बुधवारी (दि ११) सकाळी जेएनपीए एक्स्प्रेस हायवेजवळील पागोटे गावाजवळील उड्डाण पूला जवळ पेट्रोलची पाईप लाईन फुटल्याची बाब काही नागरिकांच्या निदर्शनास आल्याने त्यांची माहिती इंडियन ऑईल अदानी व्हेंचर्स लिमिटेड या प्रकल्पातील अधिकाऱ्यांना मिळताच तयांनी प्रसंग सावधगिरी बाळगून सदर फुटलेल्या पाईप लाईनच्या दुरुस्तीचे काम सुरू केले.

मात्र सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उरण – खारकोपर रेल्वे सेवा रेल्वे प्रशासनाने बंद केल्याने त्यांचा त्रास प्रवाशांना सहन करावा लागला आहे.३–३० नंतर रेल्वे सेवा सुरू करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.

या घटने संदर्भात इंडियन ऑईल अदानी व्हेंचर्स लिमिटेड प्रकल्पातील अधिकाऱ्यांना विचारणा केली असता त्यांनी बोलण्यास नकार दर्शविला आहे. तर उरण नवीमुंबई शहराकडे जाणारी रेल्वे सेवा बंद का करण्यात आली यासंदर्भात रेल्वे प्रशासनाकडे विच–ारणा केली असता त्यांनी प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी उरण – खारकोपर रेल्वे सेवा बंद केल्याचे सांगितले आहे.

## जनावरांची अवैध वाहतूक ; पाच जणांना अटक

**दै.रायगड नगरी । पेण**

तालुक्यातील वसई फाट्याजवळ जनावरांना गुंगीच्या औषध देऊन बेशुद्ध करून अवैद्यरीत्या वाहतूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात पेण पोलिसांना यश आले आहे. या याप्रकरणी पोलिसांनी पाच जणांना अटक केली असून एक आरोपी फरार झाला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपीने दोन चार चाकी वाहना मधून चार जनावरांना बेशुद्ध अवस्थेत कोंडून वाहतूक केली होती सोमवारी रात्री सापारातून ही कारवाई केली या प्रकरणी शरीफ रफिक अन्सारी २५, इम्रान मलंग पटेल ३६ मुंब्रा ठाणे, सलमान अब्दुल अहमद पटेल ३६, सोनू जुबेर खान २२, बाजल रशीद शेख १९ पनवेल, या आरोपींना अटक करण्यात पोलिसांनी यश आले आहे तर अजित शेख राहणार तळजा हा आरोपी फरार असून त्याचाही पोलिसांकडून शोध सुरू आहे कारवाई संदर्भात स्वप्निल गजानन म्हात्रे यांनी पेण पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास सुरू आहे.




### एकतेचा जयघोष, राष्ट्रीय अभिमान, एकता आणि स्वावलंबनाचा संदेश....

# पनवेलमध्ये १४ नोव्हेंबर रोजी ‘सरदार १५० युनिटी मार्च’ पदयात्रा

### नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, माय भारत केंद्राचे आवाहन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत माय भारत केंद्र रायगड, पनवेल महानगरपालिका, जिल्हा प्रशासन रायगड, राष्ट्रीय सेवा योजना आणि स्थानिक सीकेटी महाविद्यालय पनवेल ह्यांचे संयुक्त विद्यमाने सरदार१५० युनिटी मार्च आणि विकसित भारत पदयात्रा या उपक्रमाचे आयोजन १४ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ८ ते १० या वेळेत पनवेल येथील वडाळे तलाव करण्यात आले आहे.



या उपक्रमाचा उद्देश तरुणांमध्ये राष्ट्रीय अभिमान, सामाजिक जबाबदारी आणि एकतेची भावना निर्माण करणे असा आहे. या पदयात्रेद्वारे तरुणांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वजण राष्ट्राच्या ऐक्य, अखंडता आणि देशभक्तीच्या भावनांना पुनरुज्जीवित करतील. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या एकसंध भारताच्या विचारांना स्मरून एकात्म भारताच्या निर्मितीचा संकल्प या माध्यमातून घेतला जाणार आहे.सर्व नागरिकांनी या ऐतिहासिक पदयात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेच्यावतीने आयुक्त मंगेश चितळे व रायगड जिल्हा युवा अधिकारी श्री अमित पुंडे यांनी केले आहे.

देशव्यापी मोहिमेची पार्श्वभूमी : ६ ऑक्टोबर २०२५रोजी भारत सरकारने माय भारत पोर्टलवरून ‘सरदार१५० युनिटी मार्च’ या डिजिटल मोहिमेची सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमात सोशल मीडिया रील स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा आणि सरदार१५० यंग लीडर्स प्रोग्रामचा समावेश आहे. या प्रोग्राममधील १५० विजेत्यांना राष्ट्रीय पदयात्रेत सहभागी होण्याची संधी दिली जाणार आहे.

मोहिमेचे दोन टप्पे

१. जिल्हा स्तरावरील पदयात्रा (८ ते १० कि.मी.): या उपक्रमांतर्गत पहिल्या टप्प्यात प्रत्येक जिल्ह्यात ६ ते ८ कि.मी. लांबीची पदयात्रा काढली जाईल. शाळा व महाविद्यालयांमध्ये निबंध,वादविवाद, परिसंवाद, पथनाट्य आदी उपक्रम, नशामुक्त भारत व ‘अभिमानाने स्वदेशी’ अशा प्रतिज्ञा अभियानासह योग, आरोग्य व स्वच्छता मोहिम आयोजित करण्यात येणार आहे. पदयात्रेदरम्यान सरदार पटेल यांच्या प्रतिमेस अभिवादन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि प्रमाणपत्र वितरण केले जाईल.

२. राष्ट्रीय पदयात्रा (२६ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर २०२५): या उपक्रमातील दुसऱ्या टप्प्यात करमसद (पटेल यांचे जन्मस्थान) ते केवडिया (स्टॅच्यू ऑफ युनिटी) असा १५२ कि.मी. प्रवास होईल.मार्गावरील गावांमध्ये सामाजिक विकास उपक्रम, ‘डेव्हलपिंग इंडिया प्रदर्शन’ आणि ‘सरदार गाथा’ सादर केली जाईल.

देशभरातील तरुणांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून एक भारत, श्रेष्ठ भारत या संकल्पनेला प्रत्यक्षात आणावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी भारत पोर्टलवर https://myb-harat.gov.in/pages/unityšmarch नोंदणी सुरू आहेत.

**पदयात्रेचा मार्ग** : वडाळे तलाव – गावदेवी मंदिर – शिवाजी चौक – कर्मवीर भाऊराव पाटील चौक – पनवेल महानगरपालिका मुख्यालय – वडाळे तलाव

## गुरुवारी भाजप महायुतीकडून उरण नगरपरिषद निवडणुकीसाठी उमेदवारांचे नामांकन दाखल होणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतीय जनता पार्टी महायुतीतर्फे उरण नगरपरिषदेच्या निवडणुकीकरिता नगराध्यक्ष पदाचे तसेच नगरसेवक पदाचे उमेदवार गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता आपले नामांकन अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल करणार आहेत. या नामांकन दाखल सोहळ्यास रायगड जिल्ह्याचे संपर्क प्रमुख व महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, तसेच उत्तर रायगड जिल्हा भारतीय जनता पार्टी अध्यक्ष अविनाशजी कोळी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून महायुतीचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

## ट्रेलरचालकाची हाईटगेजला धडक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल–जेएनपीटी हायवे रोडवर ट्रेलरचालकाने निष्काळजीपणाने ट्रेलर चालवुन रोडवर असलेल्या हाईटगेजला ठोकर दिली. याघटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. ट्रेलरचालक विनोदकुमार यादव (वय ४० वर्षे) याने त्याच्या ताब्यातील ट्रेलर रस्त्याच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करून बेदरकारपणे, निष्काळजीपणाने चालवुन रोडवर असलेल्या हाईटगेजला ठोकर दिली. यामध्ये हाईटगेजचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात ट्रेलरचालकाविरुद्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# उद्यमशिलतेतून महिलांनी सक्षम व्हावे : जिल्हाधिकारी किशन जावळे

**दै.रायगड नगरी । रायगड–अलिबाग**

उद्यम शिलतेतून सक्षम व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी भारतीय उद्योजकता विकास संस्था (ईडीआय) अहमदाबाद उदया प्रकल्प कार्यालय अलिबाग व टाटा कम्युनिकेशन्स मुंबई पुरस्कृत नावडे पनवेल को ऑफ इंडस्ट्रीज सभागृह पनवेल येथे (दि.११ नोव्हेंबर) रोजी आयोजित महिलांकरीता उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमात केले.



या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पनवेल तहसिलदार मिनल भांबरे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस. हरळया, रायगड जिल्हा बँक तळ–ोजाचे व्यवस्थापक नितेश तोंडसे, उद्योजक विजय लोखंडे, उद्योजक लक्ष्मण जाधव सामाजिक कार्यकर्त्या व उद्योजिका श्रीमती राजश्री पाटील उपस्थित होते.

भारतीय उद्योजकता विकास संस्था (ईडीआय) व टाटा कम्युनिकेशन्सच्या सामाजिक दायीत्व विभागाकडून पुरस्कृत उदया प्रकल्पांतर्गत दोन आठवडे कालावधीचे महिला व दिव्यांगांकरीता उद्योजकता विकास कार्यक्रम घेण्यात आला होता. कार्यक्रमात सर्व प्रथम ईडीआयचे प्रकल्प अधिकारी शशिकांत दनोरीकर यांनी जिल्हाधिकारी किशन जावळे यांना पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

प्रशिक्षणामध्ये सहभागी प्रशिक्षणार्थींना जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याहस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात येवून नावडे येथील महिला प्रशिक्षणार्थींनी सुरु केलेल्या माऊली भाकरी सेंटर चे उद्घाटन जिल्हाधिकारी श्री.जावळे यांच्याहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाकरीता रायगड जिल्हा बँकेचे व जिल्हा उद्योग केंद्राचे मोलाचे सहकार्य लाभले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन ईडीआय अलिबाग प्रकल्प अधिकारी शशिकांत दनोरीकर यांनी केले. या कार्यक्रमाला महिला प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### नवीन पनवेल मधील रस्ते दुरूस्तीला वेग...

# रस्ते दुरूस्तीची कामे वेगाने करण्याच्या आयुक्तांनी संबधितांना विभागास दिल्या सूचना

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या सूचनेनूसार पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्वच प्रभागातील रस्ते दुरूस्तीची कामे जोमाने सुरू आहेत. नुकतीच पनवेल प्रभागातील रस्त्यांची अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांनी प्रत्यक्ष पहाणी केली होती. त्यानूसार रस्ते दुरूस्तीच्या कामास वेग देण्याबाबत संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या होत्या त्यानूसार नवीन पनवेल मधील रस्ते दुरूस्ती कामे वेगाने केली जात आहेत.

नवीन पनवेलमधील एचडीएफसी सर्कल ते डी मार्ट रोड पाऊसामुळे अत्यंत खराब झाला होता. या रस्त्याचे डांबरीकरण वेगाने सुरू आहे. नुकत्याच झालेल्या बैठकित आयुक्त तथा प्रशासक श्री. मंगेश चितळे यांनी खराब झालेल्या रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यानूसार अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांनी तात्काळ रस्ते दुरूस्ती करण्याबाबत संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचित केले होते.

शहर अभियंता संजय कटेकर व कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे यांच्या मार्गदर्शनाखाली चारही प्रभागामध्ये कनिष्ठ अभियंत्याच्या देखरेखीखाली रस्ते दुरूस्तीची कामे केली जात आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील तळोजा, नवीन पनवेल, खारमधील आवे पेठ, खारघरमध्ये सेक्टर ३४ फुटबॉल मैदान, सेक्टर २०, शिल्प चौक ते तवा जंक्शन, कामोठेमधील मानसरोवर स्थानकाकडून शहराकडे जाणारा रस्ता अशा विविध ठिकाणी सध्या रस्ते दुरूस्तीची कामे जोरात सुरू आहेत.



# माणगाव तालुका : इतिहास, संस्कृती आणि विकासाचा प्रवास...

रायगड जिल्ह्याच्या मध्यभागी वसलेला माणगाव तालुका हा कोकणातील निसर्गरम्य, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैभवाने संपन्न प्रदेश आहे. काळ नदीच्या काठावर वसलेले माणगाव हे फक्त भौगोलिक दृष्ट्या नव्हे, तर ऐतिहासिक आणि सामाजिक दृष्टीनेही महत्त्वाचे ठिकाण राहिले आहे. प्राचीन काळापासून स्वातंत्र्योत्तर काळापर्यंत या भूमीने अनेक बदल, चळवळी, आणि युगप्रवर्तक व्यक्तिमत्त्वे पाहिली आहेत.

माणगावचा इतिहास शेकडो वर्षांपूर्वीपर्यंत मागे जातो. कोकण पट्ट्यातील हा भाग प्राचीन काळी शिलाहार, चालुक्य आणि यादवांच्या अधिपत्याखाली होता. त्या काळात कोकणातील सागरी व्यापार फुलला होता. सावित्री आणि काळ नदी, जी महाडच्या दिशेने अरबी समुद्रात विलीन होते, ही व्यापारासाठी महत्त्वाची जलवाहतूक रस्ता होती. या नदीमार्गे वस्तूंची देवाणघेवाण होत असे आणि माणगाव हे व्यापाऱ्यांचे प्रमुख थांबे ठरले होते. प्राचीन काळात माणगाव आणि त्याच्या आजूबाजूच्या भागात तांदूळ, सुपारी, काजू, आणि मासळी व्यापार मोठ्या प्रमाणावर होत असे. येथे पारंपरिक कोकणी घरकुलं, मंदिरं, आणि गावरान संस्कृती ही त्या काळाच्या साक्षीदार आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांनी जेव्हा स्वराज्याची स्थापना केली, तेव्हा रायगड हा त्यांच्या राजधानीचा गड ठरला. माणगाव हा त्या राजधानीच्या अगदी जवळ असल्याने या भागाला विशेष राजकीय व लष्करी महत्त्व प्राप्त झाले. रायगडाकडे जाणारा गांगवली एक प्रमुख मार्ग माणगावमार्गे जात असल्याने येथे सैन्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठाणी होती. माणगाव परिसरातील सुभेदार खंडोजी माणकर, सरदार पवार, कदम, जाधव आदी असंख्य नरवीर पराक्रमी स्वराज्यप्रेमी होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजवटीत या भागात मानगड, तळेगड, पन्हळघर, सुरगड आदी गड-किल्ल्यांमध्ये दळणवळणाची व्यवस्था, शिपाई ठाणी, तसेच ग्रामरचना व्यवस्थापन चालत असे. माणगावचा परिसर हा स्वराज्याच्या पुरवठा केंद्रांपैकी एक म्हणून कार्यरत होता. अनेक ग्रामस्थांनी सैनिक म्हणून शिवराज्यात आणि स्वातंत्र्योत्तर काळात आपला वाटा उचलला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्य स्थापनेनंतर लोककल्याणकारी व्यवस्था उभारल्या. त्यांचा प्रभाव माणगाव व आसपासच्या भागावर स्पष्टपणे दिसून येतो. रायगडचा तेजोमय इतिहास माणगावच्या प्रत्येक शेतात, घरात आणि प्रत्येक मंदिरात जिवंत आहे.

१८५७ च्या उठावापासून ते १९४७ पर्यंत भारतात स्वातंत्र्यलढ्याची चळवळ सुरू होती. माणगाव तालुक्यातील लोकही या चळवळीपासून दूर नव्हते. ब्रिटीश राजवटीत माणगाव हे रायगड जिल्ह्यातील एक महत्वाचे प्रशासनिक ठिकाण होते. येथे अनेक समाजसुधारक आणि क्रांतिकारी विचारांचे लोक होते. महात्मा गांधींच्या स्वदेशी आणि असहकार चळवळीचा प्रभाव माणगावच्या तरुणांवर पडला. त्यावेळी अशोक दादा साबळे आणि त्यांच्या अनेक सहकाऱ्यांनी या चळवळीत भाग घेतला. माणगावच्या शाळांमधून स्वदेशी विचार पसरले, आणि देशभक्तीची भावना जोपासली गेली. महाड सत्याग्रह, खेड चळवळ, अल्पसंख्याकांच्या अधिकारांच्या चळवळी यांचा अप्रत्यक्ष परिणाम माणगावच्या सामाजिक विचारांवर झाला.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात माणगाव तालुका शैक्षणिक दृष्ट्या प्रगतीच्या वाटेवर गेला. या परिवर्तनामागे अनेक समाजसेवक आणि लोकनेते होते. गावागावात शाळा स्थापन झाल्या, शिक्षणाचा प्रसार झाला. या क्षेत्रात लोकनेते स्व. अशोक दादा साबळे आणि त्यांचे सुपुत्र ड. राजीव साबळे यांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. गरीब-शेतकरी वर्गातील मुलांना शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी माणगाव आणि आजूबाजूच्या भागात शाळा व महाविद्यालयांच्या माध्यमातून ज्ञानाचा प्रकाश पसरवला. माणगावातील अशोक दादा साबळे विद्यालय, माणगाव कॉलेज, द.ग.तटकरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय विधी महाविद्यालय, श्रीमती गीता दत्तात्रय तटकरे नर्सिंग कॉलेज तसेच इतर अनेक शैक्षणिक संस्था या तालुक्याच्या प्रगतीचा पाया ठरल्या. आज माणगाव हा रायगड जिल्ह्यातील शिक्षणाच्या दृष्टीने अग्रगण्य तालुक्यांपैकी एक मानला जातो.

पूर्वी माणगाव तालुका शेतीप्रधान होता. तांदूळ, नारळ, सुपारी, आंबा, काजू ही मुख्य पिकं. पण काळाच्या ओघात येथे औद्योगिकरणाची लाट आली. मुंबई-गोवा महामार्ग (छक-६६) आणि रेल्वेमार्गामुळे माणगाव औद्योगिक केंद्र बनू लागला. माणगाव एमआयडीसीच्या स्थापनेनंतर अनेक लघुउद्योग आणि कारखाने उभे राहिले. पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी, तसेच इतर उत्पादन उद्योगांनी स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून दिला. यामुळे गावोगाव आर्थिक स्थितीत सुधारणा झाली. तथापि,औद्योगिकीकरणाबरोबर पर्यावरणाचे जतन करण्याची गरज निर्माण झाली. आज अनेक समाजसंस्था आणि विद्यार्थी पर्यावरण संरक्षणाच्या उपक्रमात सक्रिय आहेत. माणगाव तालुका हिरव्यागार डोंगररांगांनी वेढलेला आहे. ताम्हिणी घाट हा निसर्ग सौंदर्याने नटलेला आहे. काळ नदी आणि इतर उपनद्या या भागाला पाणीपुरवठा करतात. येथील हवामान दमट पण सुखद आहे. पावसाळ्यात माणगावचा परिसर निसर्गसौंदर्याने नटतो. शेती हा तालुक्याचा आत्मा आहे. येथे भात, नाचणी, वरी, तसेच हंगामी भाजीपाला आणि कडधान्ये पिकवली जातात. फळबागांमध्ये हापूस आंबा आणि काजू यांना विशेष महत्त्व आहे. पर्यटनाच्या दृष्टीने माणगाव परिसरातील, ताम्हिणी घाट, निसर्गदृश्य, नद्या, देवळं, आणि पारंपरिक गावांचे वातावरण आकर्षक आहे.

माणगाव तालुक्यात विविध धर्म आणि जातींचे लोक ऐक्याने नांदतात. हिंदू, मुस्लीम, बौद्ध, गुजराती, जैन, ख्रिश्चन सर्वजण सण-उत्सव साजरे करतात. गणेशोत्सव, होळी, शिवजयंती, दहीहंडी, आणि नवरात्री हे इथले प्रमुख सण आहेत. गावागावांत असलेली वाकडाई देवी, शंकराचे संगमेश्वर, सोनभैरव, मारुती, दत्तात्रय ही प्राचीन मंदिरे या भागाच्या सांस्कृतिक समृद्धीची साक्ष देतात. माणगावचा गणपती उत्सव विशेष प्रसिद्ध आहे. या काळात संपूर्ण तालुका उजळून निघतो. लोकगीतं, नृत्यं, कोळीगीते, आणि पारंपरिक जत्रा ही संस्कृती आजही जपली जाते. आज माणगाव हे रायगड जिल्ह्याचे एक प्रमुख प्रशासकीय ठिकाण आहे. प्रांताधिकारी आणि तहसील कार्यालय, पंचायत समिती, न्यायालय, आणि शिक्षण विभागाची कार्यालयं येथे आहेत. मुंबई-गोवा महामार्गामुळे वाहतूक सोयीस्कर झाली आहे. माणगाव रेल्वे स्थानक हे कोकण रेल्वेवरील महत्त्वाचे स्टेशन आहे. दिघी- माणगाव - ताम्हिणी घाट महामार्ग यामुळे मुंबई, गोवा आणि पुण्याशी जोडणारा हा परिसर जलदगतीने विकसित होत आहे. आरोग्य, शिक्षण, उद्योग आणि पर्यटन या क्षेत्रांत प्रशासनाच्या विविध योजना राबवल्या जात आहेत. खासदार सुनील तटकरे यांसारख्या नेत्यांनी रस्ते, शाळा, पाणीपुरवठा आणि उद्योगधंद्यांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी मिळवून दिला आहे.

माणगाव तालुक्यात अनेक समाजसेवक, शिक्षक, पत्रकार, राजकारणी आणि शेतकरी नेते घडले. खासदार सुनील तटकरे, मंत्री, आदिती तटकरे, मंत्री भरत गोगावले, माजी आमदार स्व. अशोक दादा साबळे, आणि स्थानिक पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते यांनी या भूमीची विचारसंपदा जिवंत ठेवली आहे. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि युवक संघटनांच्या माध्यमातून नव्या पिढीत समाजकार्याची भावना रुजत आहे. या भूमीने मेहनती, प्रामाणिक आणि माणूसकी जपणारे लोक दिले आहेत. आज माणगाव तालुका परंपरा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम आहे. एका बाजूला औद्योगिक विकास, शिक्षणसंस्था आणि प्रशासनिक सुविधा आहेत; तर दुसऱ्या बाजूला शेती, संस्कृती, श्रद्धा आणि निसर्गाचे संतुलन आहे. शासनाच्या विविध योजनांमुळे पायाभूत सुविधांचा विस्तार होत आहे. लवकरच माणगाव हे जिल्ह्याची राजधानी होणार आहे. परंतु लोक सहभाग, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक एकता यांच्यावरच या तालुक्याचा खरा विकास अवलंबून आहे.

माणगाव तालुका म्हणजे कोकणाच्या सौंदर्याचा आरसा आणि रायगडच्या परंपरेचा अभिमान आहे. या भूमीने राजे छत्रपती शिवाजीं महाराज, संभाजी महाराज, शाहू महाराज यांचा शौर्यगौरव आणि पराक्रम पाहिला, समाजसुधारकांचा जाज्वल्य विचार ऐकला, आणि आजच्या पिढीचा प्रगतीचा उत्साह देखील अनुभवला आहे. माणगावच्या मातीत श्रम आहे, श्रद्धा आहे, आणि संस्कृतीचा सुगंध आहे. तीच परंपरा आजच्या नव्या युगात पुढे नेणे, हे प्रत्येक माणगावकरांचे कर्तव्य आहे.

**संतोष सुतार, पत्रकार, माणगाव**

# पेणची रिया कांबळे ठरली मिस रायगड २०२५ ची विजेती

**दै.रायगड नगरी । पेण**

स्वररंग पेण तर्फे आयोजित केलेल्या पेण फेस्टिवल २०२५ मध्ये सोमवारी झालेल्या सर्वात मोठ्या मिस रायगड स्पर्धेत पेणची रिया दिनेश कांबळे ही मिस रायगडची अंतिम विजेती ठरली. तर अलिबागची प्रिया विजय पाटील या स्पर्धेतील फस्ट रनरअप तर नवी मुंबईची यशस्विनी परशुराम पाटील हिने सेकंड रनरअपचे पारितोषिक पटकावले.

या स्पर्धेतील बेस्ट कॅटवॉक सृष्टी कांचन पेरवी (दादर), बेस्ट पर्सनालीटी यामिनी गणेश पाटील (पेण), बेस्ट स्माईल मनस्वी किशोर लोहार (पेण), बेस्ट हेअर प्रतिभा विजय वाघमारे (पेण), बेस्ट फोटोजनिक तन्वी संतोष पाटील, बेस्ट कॉस्ट्यूम अपूर्वा रवींद्र पाटील (पेण) या स्पर्धकांनी पारितोषिके जिंकली. या स्पर्धेत संपूर्ण रायगड जिल्ह्यातून एकूण १८ सौंदर्यवतींनी सहभाग घेतला होता. सर्वांनीच आपल्या मनमोहक अदा सादर करून रसिकांना मोहित केले. या स्पर्धेसाठी रसिकांनी विशेषता युवा वर्गाची मोठी उपस्थिती दर्शविल्याने स्टेज समोरील प्रांगण खचाखच भरले होते.

सर्व विजेत्यांना शर्मिला पाटील, प्रीतम पाटील, पेण फेस्टिवल स्वररंग पेण चे अध्यक्ष राजेंद्र साळवी, पेणचे प्रसिध्द उद्योजक नरेश जैन, खजिनदार भारती साळवी, उपाध्यक्ष सुनिल पाटील, सचिव कौस्तुभ भिडे, पेण प्रेस क्लब अध्यक्ष देवा पेरवी, अक्षता सावंत, अनिकेत साळवी, अथर्व सावंत, मृगज कुंभार, अनिरुद्ध पवार, सारिका पाटील, नेहा कुंभार, निशा साळवी, यश बांदीवडेकर, प्रसाद म्हात्रे, सृष्टी सूर्यवंशी, प्रेरणा रामधरणे, तन्वी रामधरणे, प्रशांत पाटेकर, दर्शना पाटेकर, आदि मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.




मिस रायगड २०२५ मध्ये साडी रांउड, वेस्टन राउंड व ईव्हीनींग गाउन राउंड अशा तीन राऊंडमध्ये सादर करण्यात आलेल्या या स्पर्धेची कोरिओग्राफी रुपेश चव्हाण, मुंबई व सहाय्यक कोरिओग्राफर निखिल बाचल यांनी साकारली. तर टीव्ही अँकर ऋषी देसाई यांच्या उत्कृष्ठ समालोचनाची साथ या स्पर्धेला लाभली. तर परिक्षक म्हणून वडापाव सिनेमा लेखक सिद्धार्थ साळवी, डॉ.माधवी ठाकूर, डॉ.आरती चेंदवणकर, प्रो.अक्षता साळवी यांनी काम पाहिले. यावेळी पेण फेस्टिवल २०२५ला ज्या जाहिरातदार यानी दिलेल्या प्रतिसादाबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले. सर्वांसाठी सर्वकाही ही संकल्पना असलेल्या पेण फेस्टिवलला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे स्वररंगचे अध्यक्ष राजेंद्र साळवी सर यांनी सांगितले.

## दुकानाचे शटर उचकटून गल्ल्यातून रोकड लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

हॉटेलच्या दुकानाचे शटर उचकटून अज्ञात चोरट्याने गल्ल्यातील ७० हजार रुपये चोरून नेले. या प्रकरणी खांदेश्वर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लवेश सोनवणे यांचा प्रजापती आर्केड, से-१५, नवीन पनवेल येथे कॅफे लविस्ता हॉटेल आहे. नेहमीप्रमाणे कामगार हॉटेल उघडण्यासाठी आला असता, त्याला शटर उचकटले असल्याचे दिसून आले. यावेळी सोनवणे यांनी हॉटेलमध्ये पाहिले असता, गल्ल्यातील ७० हजार रूपयांची रोकड लंपास असल्याची बाबत उघडकीस आली.

**दैनिक रायगड नगरी**
**बातम्या व जाहिरातींचे उत्तम माध्यम**
**संपर्क : ९६१९९७९७०६ / ९६१९७३७९११**

**जाहीर नोटीस**

या तमाम जनतेस कळविण्यात येते आमचे अशिल मे शुभ एंटरप्रायझेस तर्फे भागिदार श्री अंशु रामचंद्र जैसवाल पत्ताः- शिव सेंटर, ऑफीस नं १२२, प्लॉट नं ७२, से-१७, वाशी नवी मुंबई हे खालिल वर्णनाची मिळकत श्री पवन गणेश गोसावी आणी श्री सरवर हुसैन खान यांचे कडुन खरेदी करुन त्रिपक्षीय करारनाम्याद्वारे हस्तांतरण करुन घेतील.

श्री पवन गणेश गोसावी आणी श्री सरवर हुसैन खान यानी सदर भुखंड हा कडून त्रिपक्षीय कराराद्वारे विकत घेतला आहे. सदर दस्त हा नोंदणीकृत आहे सदर नोंदणी पत्रा मुळे श्री पवन गणेश गोसावी आणी श्री सरवर हुसैन खान हेच एकमेव मालक आहेत.

**मिळकतीचे वर्णन संचिका क्र २५२**

| नोड | भूखंड क्रं. | सेक्टर | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| मौजे उलवे, ता.पनवेल, जि.रायगड | २१ ई | १८ | ३०० चौ.मी. |

तरी सदर भुखंडा बाबत, कोणाचाही कोणत्याही भागावर, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरू हक्क, साठे करार, मुखत्यारपत्र, सामंजस्य करार किंवा यासारखे कोणतेही दावे, मालकी किंवा इतर कोणत्याही प्रकारचे योग्य हितसंबंध असल्यास, उक्त व्यक्ती किंवा संबंधित ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपला हक्क हितसंबध असल्यास कागदोपत्री पुराव्यासह खाली स्वाक्षरी केलेल्या पत्त्यावर लेखी कळवावे. अगर समक्ष येऊन भेटावे. वरील विहित कालावधीत कोणाचाही आक्षेप किंवा तक्रार नसल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असुन त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा हक्क, हितसंबध नाही असे समजुन आमचे अशिल सदर भुखंडाचा व्यवहार पुर्ण कर्ती व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडुन दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकानी नोंद घ्यावी.

दि.१२/११/२०२५

**सही/-**
**ॲड.श्रीमती.रेखा होवाळे**
**ऑफिस नं. १३, प्रभात सेंटर,**
**सीबीडी बेलापूर, नवी मुंबई**
**मोबाईल ८३६९०१७३६३**

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की मौजे : गणेशपुरी, तालुका : पनवेल, जि. रायगड येथील इमारत / घर क्र. १३० सर्वेक्षणानुसार आराखडा क्र. GP २५७ बांधकाम चा उपयोग रहिवाशी ह्या स्वरूपाची श्री. सत्यवान बुधाजी कोळी ह्यांची वडिलोपार्जित जमीन मिळकत महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई विमानतळ प्रकल्पाकरिता संपादित केली असून सदरहू संपादित जमिनी बद्दल सिडकोने दिनांक ०४/०८/२०१६ रोजीच्या नोंदणीकृत भाडेपट्याने क्रमांक अनुक्रमांक पवल ४ ६७९५ २०१६ पावती क्र. ७९९९ पनवेल ह्या नोंदणीकृत करारान्वये जमीन मालक श्री. सत्यवान बुधाजी कोळी रा. ह्यांस वाटप करणेत आले एकत्रितपणे वाटप करण्यात आलेला १५० चौ. मी. चा नोड उलवे येथील खालील वर्णनाचा भूखंड

**वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे वर्णन**
**नोड : उलवे, ता. पनवेल, जि. रायगड**

| भूखंड | सेक्टर | क्षेत्र | देय असलेले चटई क्षेत्र |
|---|---|---|---|
| १७२ | २५-A | १५० चौ.मी. | १.५ |

सदरहू भूखंड आमचे अशील मे. तनु डेव्हल्पर्स तर्फे प्रोप्रा. माया प्रकाश नलावडे रा. घर नं ९३६, किल्ला गावठाण, सेक्टर / १५ए, सीबीडी बेलापूर, ता. जि ठाणे नवी मुंबई ४००६१४ ह्यांस कायमस्वरूपी हस्तांतरित करीत आहेत.

सदरहू भूखंडाबाबत कोणीही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती, कंपनी, कार्यालय यांचा सदर भूखंडासंबंधी किंवा त्यावर किंवा त्याच्या भागावर विक्री, गहाणवट, भाडेपट्टा, धारणाधिकार, बक्षिस, दान किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याचा पृष्ठयर्थ त्यांनी अशा हक्काबाबत / हरकतीबाबत सुचना त्यात हक्क / हरकतीचे स्वरूप यांची माहिती अन्य तपशिलांसह की जो पुरावा म्हणून पुरेसा ठरेल, असा कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्यांकडे त्याच्या / तिच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत दाखल करावी आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदर भूखंड हा सर्व प्रकाराच्या बंधनातुन आणि अन्य हक्कांपासुन आणि अधिकारापासुन किंवा अन्य प्रकारच्या हक्काच्या बंधनातुन मुक्त आहे किंवा सदरहू हक्क संबंधितांनी स्वेच्छेने सोडून दिलेले आहे. असे समजून आमचे अशिल सदरहू मिळकतीबाबत पुढील व्यवहार पुर्ण करतील यांची नोंद घ्यावी.

दि.१३/११/२०२५
ठिकाण : नवी मुंबई

**सही/-**
**ॲड. अनुराधा प्र. टिल्लू**
**ॲड. सुनिता राम पाटील**
**कार्यालय नं. २६, प्रभात सेंटर,**
**सेक्टर-१ ए, सीबीडी बेलापूर,**
**ता. जि. ठाणे, नवी मुंबई-४००६१४**

**जाहीर नोटीस**

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, श्री. श्रावण कुमार सास्नूर, रा. सदनिका क्र. २४, संकल्प को.ऑप. हौ.सो. लि., प्लॉट नं.बी-३, सेक्टर नं. ६, नवीन पनवेल पूर्व, ता. पनवेल, जि. रायगड. यांची मौजे नवीन पनवेल, ता. पनवेल, येथील युनिट नं. २४, संकल्प को.ऑप.हौ.सो.लि., प्लॉट नं. बी-३, सेक्टर नं. ६, ज्याचे क्षेत्रफळ ३२.०० चौ. मी. बिल्टअप इतके आहे. सदरची रो हाऊस प्लॉट आमचे अशिल सौ. रत्नमाला मिठू भताने, रा. पाथर्डी, वी.टी.सी रांजणी, अहमदनगर ४१४१०२ यांनी श्री. श्रावण कुमार सास्नूर, यांच्याकडून, कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

तरी, वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचा कोणत्याही प्रकारचा, मालकीहक्क, हितसंबंध, ताबाकब्जा, गहाण, दान, बक्षीसपत्र, ॲग्रिमेंट फॉर सेल अगर अन्य कोणत्याही प्रकारचे हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसाच्या आत त्यांची हरकत कागदोपत्री पुराव्यासहीत खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवाव्यात. मुदतीत हरकत न आल्यास, वरील मिळकत निर्वेध, विनाहरकत व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर रो हाऊस प्लॉटचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि.१२/११/२०२५

**सही/-**
**ॲड.अमित दशरथ शिरवले**

**शॉप नं. २, गुरु प्रेम को. ऑप. हौ. सोसा.लि.,**
**प्लॉट नं. १९, सेक्टर नं. ८, खांदेश्वर पोलीस स्टेशन जवळ,**
**नवीन पनवेल (प), ता. पनवेल, जि रायगड - ४१० २०६.**

**सिध्दिविनायक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित**
**नोंदणी क्र. एन.बी.ओ.एम./सिडको/एचएसजी / (टिसी)/ १०६४४/डी.आर., दि. २१/०२/२०२५ भूखंड क्रमांक सी-९, सेक्टर ०४, आसुडगांव, खांदा कॉलनी.**

**इमारतीच्या पुनर्विकासासाठी निविदा मागविणेबाबत नोटीस**

१) सिध्दिविनायक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, भूखंड क्रमांक सी-९, सेक्टर ४. आसुडगांव, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प.), ता. पनवेल, जिल्हा रायगड, या गृहनिर्माण सहकारी संस्थेने आपल्या इमारतींचा पुनर्विकासाचा निर्णय घेतला असून संस्थेने नियुक्त केलेल्या वास्तुविशारदानी/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यानी याबाबतचा प्रकल्प अहवाल तयार केला आहे. सदर प्रकल्प अहवालाची संस्थेचे चेअरमन/सेक्रेटरी यांचेकडे दिनांक १२/११/२०२५ ते दिनांक १५/११/२०२५ या कालावधीत सकाळी १०-०० ते दुपारी ३-०० या वेळेत या इमारतीच्या पुनर्विकासासाठी इच्छुक विकासक याना पाहणी करता येईल, व त्याआधारे पुनर्विकासासाठी इच्छुक विकासक यांचेकडून दिनांक १५/११/२०२५ ते दिनांक १८/११/२०२५ या कालावधीत सकाळी १०-०० ते दुपारी ३-०० या वेळेत आपल्या निविदा संस्थेचे चेअरमन/सेक्रेटरी यांचेकडे जमा कराव्यात. तसेच निविदा हया कमीत कमी रकमेला प्राधान्य अशा स्वरुपाच्या नसून सभासदाना योग्य वाटेल त्या विकासकाच्या निविदेची निवड सर्वसाधारण सभेत करण्यांत येईल. निविदा मंजूर किंवा नामंजूर करणेबाबतचा अधिकार सर्वस्वी संस्थेच्या सर्वसाधारण सभेचा असेल, त्याबाबत कोणतेही कारण देण्यास संस्था बांधील नाही.

**सही/-**
**चेअरमन/सेक्रेटरी**
**सिद्धीविनायक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित**

**पनवेल महानगरपालिका**
**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | सेक्रेटरी, कोशिश फाऊंडेशन, प्लॉट नं.५५, एम.सी.सी.एच. पनवेल, पुरोहित हॉस्पिटल जवळ, पनवेल, जि.रायगड | ०३ बदाम व ०१ जांभूळ अशी एकूण ०४ झाडे तोडणी तसेच ०२ जांभुळ झाडे पुनर्रोपण करणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील जुना मुंबई-पुणे हायवे, तक्का सिग्नल येथील डॉमीनोज समोरील ट्रान्सफॉर्मर असलेल्या सार्वजनिक मोकळ्या जागेतील ०६ झाडे कोशिश फाऊंडेशनच्या माध्यमातून उभारण्यात येणाऱ्या शिल्पकला कामामध्ये बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(स्वरुप खारगे)**
**उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र. PMC-PARK/668/2025-PTAD

**वाचकांसाठी विनम्र सूचना**

'दै.रायगड नगरी' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध प्रकारच्या जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनासंदर्भात वा सेवेसंदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'दै.रायगड नगरी' वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**पनवेल महानगरपालिका**
**जाहिर ई- निविदा सुचना**
**कालावधी - ३ वर्ष**

सन २०२५-२०२६, सन २०२६-२०२७ व सन २०२७-२०२८ या ३ वर्षाकरिता पनवेल महानगरपालिका कार्यालयातील अधिकारी व पदाधिकारी तसेच विभागांच्या आवश्यक मागणीप्रमाणे सनबोर्ड, विनिल बोर्ड व ॲक्रालिक बोर्ड पुरविणेकामी जाहिर ई निविदा प्रसिद्ध करून दर निश्चित करणेकामी अंदाजपत्रक करणेबाबत तयार या कामासंबंधीचा सविस्तर तपशील www.panvelcorporation.com या संकेत स्थळावर व भांडार विभागात उपलब्ध आहे.

जा. क्र. : पमपा/भांडार/४५२५/प्र.क्र. २/९६१/२०२५
दिनांक : १२/११/२०२५

**सही/-**
**(अभिषेक पराडकर)**
**उपायुक्त (भांडार)**
**पनवेल महानगरपालिका**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

### पनवेल महानगरपालिका माझी वसुंधरा अभियान

# विविध शाळांमध्ये पर्यावरण दूतांची निवड करण्यासाठी विशेष जनजागृती उपक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि शाश्वत विकासासाठी विद्यार्थ्यांना व युवकांना प्रेरित करण्याच्या उद्देशाने पर्यावरण दूतांची निवड करण्यासाठी महापालिकेच्या शाळा क्रमांक १ व उर्दु शाळा क्रमांक १० तसेच रामशेठ ठाकूर प्राथमिक शाळा ओवे पेठ तसेच जिल्हा परिषद ओवे पेठ या शाळांमध्ये नुकताच विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात आला.

या अभियानांतर्गत १० नोव्हेंबर रोजी पनवेल महानगरपालिका शाळा क्रमांक १ मध्ये व उर्दू शाळा क्रमांक १० तसेच ११ नोव्हेंबर रोजी रामशेठ ठाकूर प्राथमिक शाळा ओवे पेठ तसेच जिल्हा परिषद शाळा ओवे पेठ मध्ये परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या परिसंवादामध्ये पर्यावरण संवर्धन, हवामान बदल साक्षरता आणि स्वच्छतेचे महत्त्व याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. या उपक्रमाद्वारे प्रत्येक शाळेतून उत्साही व जबाबदार विद्यार्थ्यांची पर्यावरण दूत म्हणून निवड करण्यात आली. हे पर्यावरण दूत पनवेल महानगरपालिकेसोबत विविध पर्यावरणीय उपक्रम, स्वच्छता मोहिमा आणि जनजागृती कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणार



आहेत. पर्यावरण विभागाच्यावतीने उपायुक्त स्वरूप खारगे यांनी महापालिका क्षेत्रातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले असून, या माध्यमातून तरुण पिढीमध्ये पर्यावरणपूरक विचारसरणी रुजविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

# माथेरान रेल्वे स्थानकात मिनी ट्रेनचे जनक यांचा फोटो अखेर पुन्हा लागला

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मिनी ट्रेन चे जनक स्वर्गीय आदमजी पीर बॉय व त्यांचे सुपुत्र हुसेन पूर्व यांचे चित्र माथेरान रेल्वे स्टेशन येथे त्यांनी माथेरान मिनी ट्रेन साठी केलेले कार्य येथे येणार आहे पर्यटकांच्या कायम स्मरणात राहावे याकरिता लावले होते परंतु मागील एक वर्षापासून हे चित्र येथून गायब झाले होते व ते चित्र पुन्हा लागावे याकरिता आदमजी पीर बॉय यांचे नातू श्री अली अकबर पिरबॉय हे रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करीत होते व काल हे चित्र पुन्हा माथेरान स्थानकामध्ये लावले गेल्याने येणाऱ्या पर्यटकांनाही अजूनही फिरवा यांचा इतिहास वाचावयास मिळाला आहे.

माथेरानच्या पर्यटनामध्ये मिनी ट्रेनचे स्थान अनन्य साधारण आहे कारण माथेरानचे पर्यटन व अस्तित्व खऱ्या अर्थाने मिनी ट्रेन सुरू झाल्यानंतरच बहरले होते या ट्रेन मधून प्रवास करण्याकरिता देश विदेशातून अनेक पर्यटक दाखल होत असतात.माथेरान मिनी ट्रेन चा इतिहास १९०७ मध्ये सुरू झाला, जेव्हा नेरल आणि माथेरान दरम्यान ही हेरिटेज रेल्वे सुरू झाली. सर आदमजी पीरभॉय यांनी आपल्या मुलाच्या, अब्दुल हुसैन आदमजी पीरभॉय यांच्या मदतीने या १९०४-१९०७ दरम्यान १६,००,००० रुपयांच्या खर्चाने बांधलेल्या रेल्वेमार्गाचे बांधकाम पूर्ण केले. ही रेल्वे माथेरानला जाण्यासाठी एकमेव रस्ता प्रदान करते, ज्यामुळे तिचे ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्व आहे. त्यांनी केलेल्या या कामाला हवा तसा सन्मान अजूनही माथेरान मधून मिळाला नसल्याची खंत यांचे नातू श्री अली अकबर पिरबॉय हे सातत्याने करीत असतात माथेरान स्थानकामध्ये त्यांचे लावलेले चित्र रेल्वे प्रशासनाकडून गहाळ झाल्यानंतर त्यांनी याबाबत संताप व्यक्त केला होता व रेल्वे व खर्चाने सुरू करणाऱ्या अशा व्यक्तींबद्दल अनादर असल्याचे या प्रकारातून सिद्ध होते असे ते सातत्याने बोलत असत परंतु आता हे चित्र पुन्हा आपल्या स्थानी आल्यानंतर मात्र त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मौजे वाजे, ता. पनवेल, जि. रायगड, येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे विदयमान मालक श्री. पांडुरंग मारुती पाटील व इतर ६ यांचे मालकी हक्कांची, ताबेकब्जातील मिळकत आमचे अशिलांनी एकूण क्षेत्रापैकी भोगवटादार यांचे मालकीची व त्यांचे ताबेकब्जात असलेले क्षेत्रापैकी ००-३०-०० या क्षेत्राकरीता कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहु मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करुन घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:

**मिळकतीचे वर्णनः-**
**मौजे-वाजे, ता. पनवेल, जि. रायगड**

| गाव | भोगवटादारांची नाव | गट क्रं. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|---|---|
| वाजे | श्री.पांडुरंग मारुती पाटील व इतर ६ | ४५/२ | १-१४-००<br>पो.ख. ०-२०-९०<br>एकूण १-३४-९० | ८.१३ |
| वरील एकूण क्षेत्रापैकी भोगवटादार यांचे मालकीची व त्यांचे ताबेकब्जात असलेले क्षेत्रापैकी ००-३०-०० या क्षेत्राकरीता | | | | |

सदरहु मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे इजमेंट, कुळ वहिवाटीचा हक्क, दावे, फरोक्त, साठेकरार, वचनपावती, वारसाहक्क, खरेदीखत, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, लिज, लीन, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी हक्क, जाणे येणेच्या रस्त्याचा हक्क वा अन्य कोणत्याही हक्काने काही हितसंबंध असलेल्या व्यक्तिंना, इतर वारसांचा व संबंधितांना ही नोटीस प्राप्त झालेपासून १५ दिवसाचे आत आपल्या हक्क हितसंबंधांचे स्वरुप विषद करुन प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडुनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निवैध व बोजाविरहीत असुन त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा त्या सोडुन दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दि.१२/११/२०२५

**सही/-**
**ॲड.रजनी अर्जून गोवारी**
**शॉप नं. १७, धारा काम्प्लेक्स को. ऑप. हौ. सोसायटी, प्लॉट नं. २१, सेक्टर-१२. कामोठे ता. पनवेल, जि. रायगड, नवी मुंबई ४१०२०९**
**मो.नं.८१०८४६००११**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीव्दारे कळविण्यात येते की, श्री. चंद्रसेन दत्तात्रेय आगिवले रा. भोकरपाडा, खानावले, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२२१. यांची परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत यांचे मालकी हक्काची ताबेकब्जातील निवासी सदनिका मिळकतीचे असेसमेंट असून सदरची निवासी सदनिकेची मिळकत असून सदरची निवासी सदनिकेची मिळकत आमचे अशिल सौ. अश्विनी आदीनाथ कांबेरे, रा. दशरथ पाटील चाळ, वाशिवली, ता. खालापुर, जि. रायगड ४१०२२२यांनी खरेदीखत करून विकत घेण्याचे ठरवलेल आहे सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

मौजे रिस येथील सर्व्हे नं. १७६/ब/३ व सर्व्हे नं. १७६/ब/४ पैकी प्लॉट नं. ३, व ४ या बिनशेती जमिन मिळकतीवर बांधण्यात आलेल्या 'श्री स्वामी दर्शन' इमारतीमधील पहील्या मजल्यावरील सुमारे ६१.५२ चौरस मीटर बांधीव क्षेत्रफळाची निवासी सदनिका क्रमांक १०१ ची मिळकत सदर मिळकतीस ग्रुप ग्रामपंचायत वासांबे, मोहोपाडा यांचे कडील असेंसमेंट रेकॉर्डप्रमाणे घर अगर मालमत्ता क्रमांक १३१३/१ असा देण्यात आलेला आहे.

वर वर्णन केलेली मिळकत माझे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे. सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, भाडेपटटा, चार्ज, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इत्यादी कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द होताच हरकत नोंदवावी. सदर बाबत कोणासही कोणत्याही प्रकारची हरकत लेखी स्वरूपात कागदपत्रासह खालील सही करणार यांचेकडे ७ दिवसात खालील पत्यावर लेखी दाखल करावी. मुदतीनंतर येणा-या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुषीने सोडुन दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध निर्विधात आहे असे गृहीत धरून माझे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील यांची नोंद घ्यावी.

खालापूर
दि.१३/११/२०२५

**सही/-**
**ॲड.विकास अशोक बडे**
**बी.ए. एल.एल.बी.**
**वकील उच्च न्यायालय**

**ऑफिस : गाळ नं. १, समर्थ शिवराम मार्केट, मेन बाजार पेठ, मोहोपाडा, ता. खालापुर, जि. रायगड ४१०२२२.**
**मो.नं. ९६६५१९७२३१, ८८८८१३३४०२**

## जाहीर नोटीस

या तमाम जनतेस कळविण्यात येते खालिल वर्णानाची मिळकत ही १) श्री. जगदंबप्रसाद द्वारिकाप्रसाद गुप्ता २) श्री सचिन गुप्ता ३) श्री अमित उमेशचंद्र गुप्ता ४) श्री मनिष उमेशचंद्र गुप्ता दिनांक १५/०७/२०१९ रोजी Sale Agreement cum lease agreement रोजी जो करार बनविला होता. त्या कराराची पुर्तता केली नाही. त्यामुळे आमचे अशिल यानी मे पनवेल न्यायालयात विशेष दिवाणी दावा क्र ३४५/२०१३ दाखल केला होता. त्याच्या आदेशानुसार १) श्री. जगदंबप्रसाद द्वारिकाप्रसाद गुप्ता २) श्री सचिन गुप्ता ३) श्री अमित उमेशचंद्र गुप्ता ४) श्री मनिष उमेशचंद्र गुप्ता यांच्या पक्षात आदेश झाला, परंतु त्याची अंमलबजावणी न झाल्या मुळे त्यानी मे पनवेल न्यायालयात स्पेशल दरखास्त क्र १४/२०१७ दाखल केली, त्याचा ही आदेश दिनांक १३/०३/२०२४ रोजी आमचे अशिल यांच्या पक्षात झाला. त्यानुसार मे न्यायालयाने वकील श्री वैभवेश शिरिष लाड याना दिनांक १५/०७/२०१९ रोजीच्या कराराची पुर्तता करणे साठी नियुक्त केले आहे.

**मिळकतीचे वर्णन संचिका क्र ६२७**

| नोड | भूखंड क्रं. | सेक्टर | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| मौजे उलवे, ता.पनवेल, जि.रायगड | १२ | १९ | १५०.०० चौ.मी. |

तरी सदर भुखंडा बाबत, कोणाचाही कोणत्याही भागावर, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरू हक्क, साठे करार, मुखत्यारपत्र, सामंजस्य करार किंवा यासारखे कोणतेही दावे, मालकी किंवा इतर कोणत्याही प्रकारचे योग्य हितसंबंध असल्यास, उक्त व्यक्ती किंवा संबंधित ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपला हक्क हितसंबध असल्यास कागदोपत्री पुराव्यासह खाली स्वाक्षरी केलेल्या पत्त्यावर लेखी कळवावे. अगर समक्ष येऊन भेटावे. वरील विहित कालावधीत कोणाचाही आक्षेप किंवा तक्रार नसल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असुन त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा हक्क, हितसंबध नाही असे समजुन आमचे अशिल सदर भुखंडाचा व्यवहार पुर्ण कर्ती व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडुन दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकानी नोंद घ्यावी.

दि.१२/११/२०२५

**सही/-**
**ॲड.श्रीमती.रेखा होवाळे**
**ऑफिस नं. १३, प्रभात सेंटर, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई**
**मोबाईल ८३६९०१७३६३**

ॲड. प्रदिप भोईर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधीश (क स्तर) यांचे न्यायालयांत
दि.चौ.अर्ज क्र.१३८९/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.२४/१२/२०२५

१) श्रीमती सुरेखा एमेन चौधरी
वय ५१ वर्षे, धंदा. गृहीणी
२) श्रीमती क्रिस्टीना संतन बॅरीटो
वय ४९ वर्षे, धंदा. गृहीणी
रा. रूम नं.३०१. 'बी' विग, दोहा रेसिडेन्सी,
माकणे सफाळे, कापसे, जि. पालघर, पिन ४०११०२
३) श्री हर्ष संजय गायकवाड
वय. २१ वर्षे, धंदा. शिक्षण
क्र. १ व ३ रा. रूम नं.३०१, तिसरा मजला,
टाचल आश्रय कॉ. हौ. सोसायटी, प्लॉट नं.६९/७०,
सेक्टर नं.०८. नवीन पनवेल, ता. पनवेल,
जि. रायगड, पिन. ४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ व २ यांचे वडील व अर्जदार क्र. ३ यांचे आजोबा मयत आनंद उर्फ अनंत धर्मा गायकवाड हे दि. १२/०६/२०२५ रोजी एम. जी. एम, हॉस्पीटल, कामोठे येथे उपचारादरम्यान मयत झाले आहेत. मृत्यू समयी मयत आनंद उर्फ अनंत धर्मा गायकवाड यांच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालिलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

फ्लॅट नं. ३०१, आचल आश्रय कॉ.हौ. सोसायटी, तिसरा मजला, सेक्टर नं. ०८, प्लॉट नं. ६९/७०, क्षेत्र २२१२ चौ.मी (कारपेट) / ३०.५७ चौ.मी (बिल्टअप), आणि १०.२२ चौ.मी (ओपन टेरेस) नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड

अर्जदार यांनी सदरील चौकशी अर्ज मयत आनंद उर्फ अनंत धर्मा गायकवाड यांचे कायदेशिर वारस असल्याचे घोषित करुन मिळणेकरीता दाखल केला आहे सबब सदरील चौकशी अर्जाचे कामी अर्जदार यांचे क्लेम सबंधात जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत में न्यायालयात दाखल करावी विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभात वारस दाखला प्रदान करण्यात येईल, हे सर्व कळावे.

ही नोटीस आज दि१२/११/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्याने दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीव्दारे कळविण्यात येते की, श्री. सत्यनारायण रामबिलास जाजू यांचे मालकीहक्कातील, ताबेकब्जातील व वहिवाटीतील जमीन मिळकत आहे. तिचे वर्णन खालीलप्रमाणे.

| गावाचे नाव | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार | भोगवटादाराचे नाव |
|---|---|---|---|---|
| मौजे : चिंचवली तर्फे वाजे, ता.पनवेल, जि.रायगड | ५८/१ | ०.४०.४०<br>पोटखराबा ०.०८.१०<br>एकूण क्षेत्र ०.४८.५० | ०८.५० | श्री. सत्यनारायण रामबिलास जाजू |

उपरोक्त नमुद जमीन मिळकत ही श्री. सत्यनारायण रामबिलास जाजू यांचे मालकीहक्कातील, ताबेकब्जातील व वहिवाटीतील जमीन मिळकत आहे.

तरी सदरहू जमीन मिळकतीसंबंधी अथवा तिच्या कोणत्याही हिश्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षीस, चार्ज अटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा, कोणत्याही प्रकारची बुकींग वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष दाखल कराव्यात. या प्रमाणे मुदतीत्त हरकती न आल्यास सदरहू जमीन मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे माझे अशील समजतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत खरेदीदार यांच्यावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.१२/११/२०२५

**सही/-**
**ॲड.राजेश्री भाऊसाहेब विखे-पाटील**
**पवन अपार्टमेंट, १०१, पनवेल कोर्टासमोर, लोखंडीपाडा, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९५९४३५८६७०**

## अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात

जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग, जि. रायगड

क्रमांक/आरटीएस/अपील क्र. २७९/२०२५

१ श्री. कृष्णा परशुराम पाटील
२ श्री. सुनिल कृष्णा पाटील
३ श्रीम. सुनंदा रामकृष्ण पाटील
४ श्री. सुनित कृष्णा पाटील
५ श्रीम. रजनी सतिश पाटील
६ श्रीम. रोशनी सतिश पाटील
७ श्री. संदेश सतिश पाटील
सर्व रा. रोहिंजण, ता. पनवेल, जि. रायगड — अपिलार्थी

विरुध्द

१ श्री. नरेश दामोदर पाटील
रा. वाजे, ता. पनवेल, जि. रायगड
२ श्री. हिमांशू शेखर मल्लिक
रा. बेदौली, सनाहपूर, दरभंगा, बिहार- ८४७ ३०७
रा. प्रक्रिती स्पर्श, १/३, ३०१, वाजे,
पो. वाजे, ता. पनवेल, जि. रायगड
३ श्रीम. शशिप्रभा मल्लिक
रा. बेदौली, सनाहपूर, दरभंगा, बिहार - ८४७ ३०७
रा. प्रक्रिती स्पर्श, १/३, ३०१, वाजे,
पो. वाजे, ता. पनवेल, जि. रायगड
४ श्रीम. प्राजक्ता प्रविण मयेकर
रा. बिल्डींग नं. एल १०, रुम नं. ७८,
वृंदावन कॉलनी, टिळक नगर - २,
सहाकर टॉकिजजवळ, चेंबूर, मुंबई- ४०० ०८९
रा. २०१, प्रक्रिती स्पर्श, बिल्डींग नं. ३,
वाजे, ता. पनवेल, जि. रायगड
५ श्री. पंकज दत्तात्रेय भालेकर
रा. वाजे, ता. पनवेल, जि. रायगड — उत्तरार्थी

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार अपील**

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे वाजे, ता. पनवेल, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ९९/० क्षेत्र ०-३२-० हे. आर. आकार ०.५३ या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील आरटीएस अपील क्र. १९८/२०२४, दि. १३/०५/२०२५ मधील आदेशाविरुध्द या न्यायालयाकडे अपील दाखल केलेले आहे. सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपीलामध्ये दि. २८/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग हे सुनावणी घेणार असून सदरची सुनावणी अपर तहसिलदार पनवेल यांचे कार्यालय, खोली क्रमांक ३०७, प्रशासकीय भवन, आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके ऑडीटोरीयन समोर, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथे निश्चित करणेत आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर राहील्यास आपले गैरहजेरीत प्रकरणामध्ये सुनावणी होऊन आदेश दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ११/११/२०२५

**सही/-**
**अपर जिल्हाधिकारी रायगड**
**अलिबाग करिता**

## अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात

जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग, जि. रायगड

क्रमांक/हक्कनोंद/अपील क्र. ३७४/२०२५

चंद्राबाई नामाजी भोईर उर्फ चंद्राबाई खन्ना नायडो मयत तर्फे वारस
१ श्री. दशरथ नामाजी भोईर
रा. भोईर हाऊस, मढ मार्वे रोड, मढ मार्केट मढ,
नवा नगर, मालाड पश्चिम, मुंबई- ४०० ०६१ — अपिलार्थी

विरुद्ध

नारायण चांगू भोईर मयत तर्फे वारस
१ श्री. मिन्नाथ उर्फ मिननाथ नारायण भोईर
रा. दादरपाडा, पो. दिघोडे, ता. उरण, जि. रायगड
२ श्रीम. पदमुबाई उर्फ चांगुणा हिराजी भोपी
रा. मोठी जुई, ता. उरण, जि. रायगड
३ श्रीम. मुक्ताबाई हरिश्चंद्र पाटील
रा. पाणजे, ता. उरण, जि. रायगड
४ श्रीम. मथुराबाई बाळकृष्ण घासे उर्फ धाले
रा. मोठी जुई, ता. उरण, जि. रायगड
५ श्रीम. सिताबाई उर्फ शितल रोहिदास केणी
रा. चिंचपाडा, ता. पनवेल, जि. रायगड
नामाजी चांगू भोईर मयत तर्फे वारस
६ श्रीम. माईबाई नामाजी भोईर
रा. दादरपाडा, पो. दिघोडे, ता. उरण, जि. रायगड
७ श्रीम. लक्ष्मी नामाजी भोईर
रा. दादरपाडा, पो. दिघोडे, ता. उरण, जि. रायगड
८ श्रीम. सुमन रामदास गोवारी
रा. दिघोडे, ता. उरण, जि. रायगड
९ श्री. शंकर नामाजी भोईर
१० श्री. दताराम नामाजी भोईर
अ. क्र. ९ व १० दादरपाडा,
पो. दिघोडे, ता. उरण, जि. रायगड
जानी उंदीर कासकर उर्फ
जानीबाई उंदीर गोवारी मयत तर्फे वारस
११ श्री. बाळकृष्ण हसुराम गोवारी
रा. दिघोडे, ता. उरण, जि. रायगड
१२ श्री. धनाजी हसुराम गोवारी
रा. दिघोडे, ता. उरण, जि. रायगड
१३ श्रीम. बामीबाई पोशा पाटील
रा. मोठी जुई, ता. उरण, जि. रायगड
१४ श्रीम. बेबीबाई महादेव पाटील
रा. मोठी जुई, ता. उरण, जि. रायगड
१५ श्री. आदार उर्फ आधार नारायण गोवारी
रा. दिघोडे, ता. उरण, जि. रायगड
१६ श्रीम. सुशिला दिलीप केणी
रा. चिंचपाडा, ता. पनवेल, जि. रायगड
१७ श्रीम. आशा परेश गोंधळी,
रा. चिंचपाडा, ता. पनवेल, जि. रायगड
१८ श्रीम. तेजश्री विनोद गोवारी
रा. कामोठे, हनुमान मंदिराजवळ, ता. पनवेल, जि. रायगड
१९ श्रीम. विमल विनोद कासुकर
रा. दादरपाडा, पो. दिघोडे, ता. उरण, जि. रायगड
२० श्रीम. वंदना दत्तात्रेय भोईर
रा. मोठी जुई, ता. उरण, जि. रायगड
२१ श्री. देविदास महादेव भोईर
रा. मोठी जुई, ता. उरण, जि. रायगड
२२ श्री. चंद्रकांत महादेव भोईर
रा. मोठी जुई, ता. उरण, जि. रायगड
२३ श्रीम. केसर उर्फ केशर सुनिल पाटील
रा. कामोठे, हनुमान मंदिराजवळ, ता. पनवेल, जि. रायगड
२४ श्रीम. गुलाब सदाशिव बंडा
रा. नवघर, ता. उरण, जि. रायगड
२५ श्री. नागेंद्र प्रताप सिंह
२६ श्री. जुगदीप कुमार सेहगल
अ. क्र. २५ व २६ रा. एन आर आय कॉम्पलेक्स,
नेरुळ, फेज २८, सेक्टर ५६, नवी मुंबई ४०० ७०६ — उत्तरार्थी

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये**

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे बेलोंडाखार, ता. उरण, जि. रायगड येथील सव्र्हे नं. ९/८ क्षेत्र ०-२६-०० हे. आर आकार ३.७५, १०५/३ क्षेत्र ०-४०-७० हे. आर. आकार ०.८९, १०६/५ क्षेत्र ०-६१-१० हे. आर. आकार ७.६३, ११०/५ क्षेत्र ०-२३-० हे. आर. आकार १.०० या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील आरटीएस अपील क्र. ३०९/२०२४, दि. २१/०७/२०२५ मधील आदेशाविरुध्द या न्यायालयाकडे अपील दाखल केले आहे. सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपीलामध्ये दि. २१/११/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग हे सुनावणी घेणार असून सदरची सुनावणी अपर तहसिलदार पनवेल यांचे कार्यालय, खोली क्रमांक ३०७, प्रशासकीय भवन, आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके ऑडीटोरीयन समोर, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथे निश्चित करणेत आलेली आहे तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर स्तके आपण जर न राहील्यास आपले गैररहजेरीत प्रकरणामध्ये सुनावणी होऊन आदेश दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ११/११/२०२५

**सही/-**
**अपर जिल्हाधिकारी रायगड**
**अलिबाग करिता**

# कामोठेमध्ये पाच ठिकाणी दैनिक बाजार उभारणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिडकोचा अनेक ठिकाणचा विकास हा फक्त कागदावर होता; मात्र पनवेल महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर तो विकास प्रत्यक्षात उतरतो आहे. भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून आपण सर्व जण हा विकास वेगाने व्हावा यासाठी कार्यरत आहोत, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. ते कामोठे येथे आयोजित दैनिक बाजारांच्या भूमिपूजन कार्यक्रमात बोलत होते. पदाधिकारी आणि कार्यकर्ते हेच खर्या अर्थाने विकासाचे शिल्पकार आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळेच आज अनेक विकासकामे मार्गी लागत आहेत, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने कामोठे परिसरात पाच ठिकाणी दैनिक बाजार उभारण्यात येणार आहेत. एकूण ८ कोटी ८४ लाख ६ हजार ४८३ रुपयांच्या निधीतून हे काम करण्यात येणार असून, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाने यासाठी पाठपुरावा केला. त्यानुसार हे काम मंजूर झाले असून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत माजी नगरसेवक दिलीप पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन पार पडले.




या कार्यक्रमाला पनवेल महानगपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे कामोठे मंडल अध्यक्ष विकास घरत, पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विजय चिपळेकर, कुसुम म्हात्रे, हेमलता गोवारी, जिल्हा चिटणीस विद्या तामखेडे, कामोठे मंडळ सरचिटणीस हर्षवर्धन पाटील, भाजप नेते प्रदीप भगत, राजेश गायकर, सुशील शर्मा, रवी गोवारी, भाऊ भगत, पल्लवी पाटील, सुरेखा लांडे, वर्षा शेलार, जैनकुमार डिंगोरे, मयूर मोहिते, संतोष म्हात्रे, चंद्रकांत कडू, सुरेश खरात, मनोहर शिंगाडे, तुलसा घरत आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

# तळोजा फेज १ मधील रस्ते दुरूस्तीच्या कामांना वेग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आयुक्त श्री.मंगेश चितळे यांनी दिलेल्या सूचनांनूसार पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खारघर प्रभागातील तळोजा पाचनंदमधील तळोजा फेज १ सेक्टर १० मधील खराब झालेल्या रस्त्याच्या दुरूस्तीच्या कामांना वेग आला आहे.



सध्या पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागातील खराब झालेल्या रस्त्यांची दुरूस्ती मोठ्या प्रमाणात सुरू आहे. आयुक्तांच्या सुचनेनूसार तळोजा पाचनंदमधील तळोजा फेज १ सेक्टर १० मधील खराब झालेल्या रस्त्याच्या दुरूस्तीची कामे वेगाने केली जात आहे. अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली रस्ते दुरूस्तीसाठी महापालिकेच्या बांधकाम विभागतील कनिष्ठ अभियंताचा स्वतंत्र कक्ष तयार करण्यात आला आहे. नागरिकांची गैरसोय होऊ नये, खराब रस्त्यांबाबत तक्रारी दाखल करण्यासाठी विभागनिहाय कनिष्ठ अभियंत्यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. शहर अभियंता संजय कटेकर व कार्यकारी अभियंता सुधीर साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली कनिष्ठ अभियंता त्या त्या प्रभागातील रस्ते दुरूस्तीची कामे वेगाने करतआहेत.

### वंदे मातरम १५० व्या वर्धापनदिन शासकीय तालुकास्तरिय समितीवर

# ज्येष्ठ पत्रकार संजय कदम व आप्पासाहेब मगर नियुक्ती

**दै.रायगड नगरी । पनवेल**






बंकीमचंद्र चटटोपध्याय यांनी १८५७ साली लिहिलेले वंदे मातरम या गीतास स्वातंत्र लढयात तसेच स्वातंत्रोत्तर कालखंडातही अनन्ययाधारण महत्व प्राप्त आहे. आनंदमठ या कादंबरीतील हे गीत भारतमातेच्या स्तृतीचे प्रतीक असून, स्वातंत्र्य लढयातील असंख्य क्रांतीकारकांना प्रेरणादायी ठरलेले आहे. या गीतास दिनांक. ०७ नोव्हेंबर, २०२५ रोजी १५० वर्ष पूर्ण होत आहे.त्यानिमित्ताने शासन निर्णयानुसार, राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये वंदे मातरम गीताच्या १५० व्या वर्धापन दिनाचे यशस्वी आयोजनासाठी अपर तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरिय समिती स्थापन करण्यात येत आहे. यामध्ये पनवेलमधील ज्येष्ठ पत्रकार संजय कदम व खारघर येथील ज्येष्ठ पत्रकार आप्पासाहेब मगर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या कमिटीमध्ये अप्पर तहसीलदार पनवेल जितेंद्र इंगळे हे अध्यक्ष, गटविकास अधिकारी समीर वाठारकर सदस्य, सहा. आयुक्त कौशल्य विकास मोहसीन वस्ता, प्रतिनिधी, सदस्य गटशिक्षणाधिकारी शाहू सकपाळ, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी पिल्ले सर, महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे प्राधिकृत प्रशिक्षण संस्था, प्रतिनिधी योगेश पाटील, अध्यक्ष व ज्योती लोहार सचिव, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे, शिक्षण संस्था प्रतिनिधी वाय.टी.देशमुख व राजेंद्र पालवे, संत श्रीकांतजी महाराज मोहोकर, क्रिडापटू प्रसाद ढवळे, विवेक सावंत, साहित्यिक गणेश म्हात्रे, सुनिता खरे, पत्रकार संजय कदम, आप्पासाहेब मगर, गडकिल्ले संवर्धन समिती सदस्य सागर मुंढे, प्रतिक चाचड, उद्योजक प्राग्वंश पाटील, संदीप मोहिते, महिला बचत गट प्रमुख अंजली इनामदार, स्वाती पवार, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी जाणीव एक सामाजिक संस्था, पनवेल, जागृती मित्र मंडळ, केदार भगत मित्र मंडळ व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य विजय तिकोले आदी मान्यवर या समितीमध्ये सहभागी असल्याची माहिती अप्पर तहसीलदार पनवेल जितेंद्र इंगळे यांनी दिली.

# माणगावची लेक स्वरा बामगुडे भारतीय महिला क्रिकेटचा उदयोन्मुख तारा

**दै.रायगड नगरी । माणगाव**

भारतीय महिला क्रिकेट संघाने नुकत्याच झालेल्या महिला वर्ल्ड कप स्पर्धेत विजेतेपद मिळवून इतिहास रचला. या विजयाचा क्षण देशभर साजरा होत असताना माणगावमध्ये एक अनोखी भावना होती. कारण टीव्हीवरील प्रत्येक भारतीय खेळाडूमध्ये माणगावच्या स्वरा बामगुडे हिचा उत्साह आणि आत्मविश्वास दिसत असल्याचा भास सर्वांना होत होता.



स्वरा बामगुडे ही माणगावचा अभिमान ठरत आहे. मा. नगरसेवक आणि उद्योजक नितीन बामगुडे यांची ही कन्या अल्पवयातच क्रिकेटच्या माध्यमातून स्वतःचं वेगळं स्थान निर्माण करत आहे. स्वरा ही केवळ गुणी आणि हुषार नाही, तर ती अतिशय चाणाक्ष, मितभाषी आणि मेहनती आहे. स्वरा ही सुधाकर नारायण शिपुरकर आणि गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी असून तिच्या व्यक्तिमत्त्वात आत्मविश्वासाची झळाळी दिसते आणि तोच तिच्या खेळाचा मुख्य आधार आहे.

माणगावच्या मैदानावर सकाळच्या सरावावेळी स्वराला फलंदाजी करताना पाहिलं की तिचं तंत्र, एकाग्रता आणि शिस्त सर्वांना भावते. तीच्या फलंदाजीतील नजाकत, चेंडूवरील नियंत्रण आणि यष्टिरक्षणातील चपळता पाहता ती मोठं काहीतरी साध्य करणार, असा ठाम विश्वास वाटतो. क्रिकेटमध्ये फलंदाज आणि यष्टिरक्षक या दोन्ही भूमिका समर्थपणे निभावणं हे दुर्मिळ आहे, आणि स्वरा या दुहेरी जबाबदाऱ्या उत्कृष्टरीत्या पार पाडते.

सध्या ती नवी मुंबईतील डॉ. डि. वाय. पाटील कॉलेजमध्ये क्रिकेटचे प्रशिक्षण घेत आहे. नामवंत प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ती आपला खेळ अधिक परिष्कृत करत असून राज्य व राष्ट्रीय स्तरावर खेळण्याचे ध्येय तिने ठरवले आहे. सकाळी ६ ते १२ आणि ४ ते ८ खडतर सराव आणि व्यायाम करुन घाम गाळते. १२ ते ४ कॉलेज असा तीचा रोजचा दिनक्रम सुरू असतो. तीच्या डोळ्यांत मोठं स्वप्न आहे आणि ते पूर्ण करण्याची जिद्दही तितकीच प्रबळ आहे.

एक दिवस माणगावची ही लेक भारतीय महिला क्रिकेट संघात युवा फलंदाज आणि यष्टिरक्षक म्हणून झळकणार, असा विश्वास तमाम माणगावकर व्यक्त करत आहेत. तिच्या उज्ज्वल भवितव्यासाठी माणगाववासियांचे आशीर्वाद आणि शुभेच्छा तिच्यासोबत आहेत.

स्वराने माणगाव येथे क्रिकेटचा श्री गणेशा सुरू केला. आता लवकरच स्वरा श्रीलंका येथे क्लबकडून क्रिकेट खेळण्यासाठी सज्ज होणार आहे. स्वराचा आत्मविश्वास, जिद्द आणि परिश्रम तिच्या यशाच्या मार्गावर सतत प्रकाश देत राहोत, आणि तिच्या कर्तृत्वाने माणगावचा झेंडा देशभर अभिमानाने फडकत राहो अशी प्रार्थना माणगावकर करीत आहेत.

# विठ्ठल नगरातील रस्ता रुंदीकरणासाठी रहिवाश्यांच्या खोट्या सह्यांचा अर्ज

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत नगरपरिषद हद्दीतील विठ्ठल नगर परिसरात अंतर्गत रस्ता रुंदीकरणाच्या प्रस्तावावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. या भागातील सुमारे अठ्ठावन्न रहिवाशांनी नगरपरिषदेकडे निवेदन सादर करत या प्रस्तावाला कडाडून विरोध नोंदवला असून, या प्रकरणात खोट्या सह्या घेऊन दिशाभूल केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे.

मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांना दिलेल्या निवेदनानुसार, विठ्ठल नगर परिसरातील विद्यमान सहा मीटरचा रस्ता नऊ मीटर करण्यात यावा, असा अर्ज नगरपरिषदेकडे काही दिवसांपूर्वी करण्यात आला होता. या अर्जाबाबत रहिवाशांनी माहिती अधिकारातून प्रत मिळवली असता आश्चर्याचा धक्का बसला. कारण, अर्जावरील अनेक स्वाक्षऱ्या आपल्या नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. आम्ही असा कोणताही अर्ज दिला नाही, तसेच कोणत्याही रुंदीकरणास सहमती दर्शविली नाही, असे स्पष्ट करत या अर्जामागे स्वार्थी हेतू असल्याचा दावा रहिवाशांनी केला आहे.




या परिसरातील रस्ता हा फक्त अंतर्गत रस्ता असून पुढे कृषी संशोधन केंद्राची जागा आणि गटार असल्याने हा रस्ता 'डेड एंड' वर जातो. दुसऱ्या बाजूसही सत्यम अपार्टमेंटजवळ रस्ता संपतो. त्यामुळे वाहतुकीचा मोठा प्रश्न येथे निर्माण होत नसल्याचे रहिवाशांचे म्हणणे आहे. अशा परिस्थितीत नऊ मीटर रस्त्याची गरजच काय? असा सवाल ते उपस्थित करतात. विद्यमान रस्त्यावर वाहने उभी असली तरीही वाहतुकीला फारसा अडथळा येत नाही, असेही त्यांनी नमूद केले आहे.

रहिवाशांचा आरोप असा की एका विकासकाला बांधकामासाठी अधिक मजले उभारण्याकरिता अतिरिक्त एफएसआयची आवश्यकता आहे. त्यासाठी रस्ता रुंदीकरणाचा मुद्दा पुढे रेटला जात असून त्याच्याच फायद्यासाठी हा अर्ज खोट्या सह्यांवर आधारित करून नगरपरिषदेत जमा करण्यात आला आहे. या विकासकामध्ये स्थानिक भाजप नेते सुनील गोगटे भागीदार असल्याने या प्रकरणात त्यांचाच हस्तक्षेप असल्याचा स्थानिकांचा आरोप आहे. याबाबत सुनील गोगटे यांच्या सोबत संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

संपूर्ण परिसरातील घरांची जागा लहान असून, रस्ता नऊ मीटरचा केल्यास अनेक प्लॉट्सची रुंदी कमी होईल. घरांच्या बांधकामावर, विकासावर आणि भविष्यातील सोयीसुविधांवर त्याचा गंभीर परिणाम होईल, अशी भीती लोकांनी व्यक्त केली आहे. रहिवाशांनी दिलेल्या या निवेदनात त्यांनी आपल्या हरकतीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून खोट्या अर्जाला मान्यता न देण्याची मागणी नगरपरिषदेकडे केली आहे. नगरपरिषदेने यावर काय निर्णय घेणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. होऊ घातलेल्या कर्जत नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या तोंडावर पुढील काही दिवसांत हा मुद्दा आणखी तापण्याची चिन्हे आहेत. वेळप्रसंगी आंदोलन किंवा गुन्हा दाखल करण्याची आमची तयारी आहे असे विठ्ठल नगरवासीय राजेंद्र वैशंपायन यांनी सांगितले.

# जेष्ठ पत्रकार रमेश भोळे यांना इंटरनॅशनल अचिव्हर्स अवार्ड जाहीर

**दै.रायगड नगरी । पनवेल**



दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघ नाशिक यांच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त दर वर्षी महाराष्ट्रातील आपापल्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना इंटरनॅशनल अचिव्हर्स अवार्ड पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. या वर्षीचा पत्रकारिता क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ज्येष्ठ पत्रकार रमेश भोळे यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे,. रमेश भोळे हे अनेक वर्षे पत्रकार, संपादक म्हणून ते काम पाहत आहेत. साईंचे सोबती या पुस्तकांचे ते लेखक असून दरवर्षी दिवाळी अंकां मध्ये तसेच साईलीला अंकांमध्ये त्यांचे अनेक लेख कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. रमेश भोळे यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील कार्याची दखल घेत त्यांना इंटरनॅशनल अचिव्हर्स अवॉर्ड जाहीर करण्यात आला आहे. हा राष्ट्रीय पुरस्कार सोहळा मंगळवार दिनांक ६ जानेवारी रोजी दुपारी अडीच वाजता श्री साईबाबांची पुण्यभूमी शिर्डी येथे मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. पत्रकार रमेश भोळे यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याने सर्वस्तरातून त्यांचे हार्दिक अभिनंदन होत आहे.

# खांदेश्वर पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांच्या वागणुकीबद्दल तक्रार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय याचा अर्थ सज्जनांचे रक्षण करणे आणि दुर्जनांचा नायनाट करणे असा होतो. महाराष्ट्र पोलिसांचे हे महत्वाचे ब्रीदवाक्य सामन्य माणसांना सदैव सुरक्षित राहण्याची भावना निर्माण करत असतो. या संवेदनशील जवाबदारीत कर्तव्यदक्ष पोलीस सज्जन नागरिकांचे संरक्षण करण्यास आणि वाईट लोकांपासून (गुन्हेगारांपासून) त्यांचा बंदोबस्त करण्यास वचनबद्ध असतात. पण या ब्रीदवाक्याला गालबोट लागेल अशी काही घटना पनवेल तालुक्यातील माजी नगरसेवक संतोष हिरामण उरणकर यांनी निवेदन तक्रार अर्जात केली.

संतोष उरणकर यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या कार्यपद्धतीचे कौतुक करून तेथील शिपाई सलीम तडवी अपवाद असल्याचे सांगत बेजबाबदारपणे कसलीही भीती न बाळगता ते पासपोर्ट चौकशीच्या कामात बेडरपणे पैशाची मागणी करत उद्धटपणे वागत नागरिकांना त्रास देतात असे उल्लेखले गेले आहे. या गंभीर घटनेची तक्रार त्यांनी माननीय पोलीस आयुक्त तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक खांदेश्वर यांच्याकडे अर्जाद्वारे केली असून शिपाई सलीम तडवी यांची या विषयी चौकशी लावण्यात यावी तसेच त्यांची बदली करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

या तक्रारीमुळे पोलीस प्रशासन व सामन्य नागरिकांमधील अविश्वास व तणावाचा प्रश्न ऐरणीवर येत आहे. या गंभीर विषया प्रकरणी वरिष्ठ पोलीस अधिकारी कशा पद्धतीने कारवाई करून नागरिकांच्या अडचणीचे समाधान करतील याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

सलीम तडवी हे पैसे दिले कि खुश असतात नाहीतर गरिबांचे काम असले कि त्यांच्याशी अरेरावीने बोलणे करत असल्याच्या अनेक नागरिकांच्या तक्रारी आहेत तरी तडवी यांना तात्काळ इतरत्र बदली करावी अशी मागणी होत आहे.

# अजय सावंत यांच्या रूपाने माथेरानला मिळणार अनुभवी नेतृत्व

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मधील एक मुरब्बी राजकारणी आणि मुत्सद्दीपणे समाजकारण करण्यात हातखंडा असणारे सर्वांचे लाडके राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी नगराध्यक्ष अजय सावंत यांना नगरपरिषदेच्या आगामी थेट नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत वरिष्ठांकडून आणि कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव उमेदवारी देण्यात येणार असल्याने मागील चार दशकांपासूनचा राजकीय क्षेत्रातील दांडगा अनुभव त्याचप्रमाणे सामाजिक कार्यात सक्रीय सहभाग असल्याने यावेळी अजय सावंत यांच्या रूपाने पुन्हा एकदा एक अनुभवी नेतृत्व माथेरानला लाभण्याची शक्यता वर्तवली जात आहे. खासदार सुनील तटकरे यांचे निकटवर्तीय म्हणून त्यांची ओळख असून त्यांनी वरिष्ठांच्या



सहकार्याने गावातील नागरिकांना अभिप्रेत असणारी कामे, पर्यटन वाढीच्या दृष्टीने महत्वपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी त्यांनी आपल्या कार्यकाळात शर्थीचे प्रयत्न केले होते. त्याचबरोबर त्यांनी आजमितीपर्यंत लोकांच्या सुखदुःखात नेहमीच आपला सहभाग नोंदवला आहे. सहकार क्षेत्रात उत्तम कामगिरी पार पाडत असून माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेच्या सभापती पदाला न्याय देण्याची महत्वाची भूमिका ते पार पाडत आहेत. लोकांच्या अडीअडचणी वेळी धावून जाणे हा गुणधर्म त्यांच्या अंगी असल्याने गावातील नागरिक, युवा वर्ग, जेष्ठ मंडळी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे एकंदरीत चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे. त्यांचे नगराध्यक्ष पदासाठी नाव निश्चित झाल्यावर समाज माध्यमांवर तसेच वैयक्तिक भेट घेऊन त्यांना सर्व स्तरातून शुभेच्छा मिळत आहेत. प्रत्येक प्रभागात त्यांचा चाहतावर्ग मोठया प्रमाणावर असून यावेळी मतदार त्यांच्या बाजूने निश्चितच कौल देतील अशी सुज्ञ मतदारांमधून चर्चा ऐकावयास मिळत आहे.